पुढारी ५-०२-२०

# जोशी रुग्णालयाच्या खाजगीकरणा-विरोधात श्रमजीवीचे आंदोलन सुरू

## २० फेब्रुवारीला अप्पर तहसील कार्यालयावर मोर्चा काढणार

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर येथील भारतरत्न स्व. पंडित भीमसेन जोशी या शासकीय रुग्णालयात रुग्णसेवा योग्य प्रकारे मिळत नसल्याचा दावा करीत आ. गीता जैन यांनी हे रुग्णालय खाजगी-लोक सहभाग (पीपीपी) तत्त्वावर चालविण्याची मागणी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्याकडे नुकतीच केली. त्याला आरोग्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने या रुग्णालयाच्या खाजगीकरणाविरोधात श्रमजीवी संघटनेने १ फेब्रुवारीपासून आंदोलन छेडण्यास सुरुवात केली आहे. तसेच येत्या २० फेब्रुवारीला भाईंदर येथील अप्पर तहसील कार्यालयावर इशारा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे संघटनेचे कार्याध्यक्ष सुलतान पटेल यांनी सांगितले.

पालिकेने लाखो रुपये खर्च करून जिल्हा परिषदेची टेम्बा येथील जागा रुग्णालयासाठी खरेदी केली. त्यावर कोट्यवधी रुपये खर्च करून २०० खाटांचे ४ मजली रुग्णालय बांधले. याखेरीज लाखो रुपये किमतीची वैद्यकीय उपकरणे, साहित्य खरेदी केले. यानंतर हे रुग्णालय चालविणे आवाक्याबाहेरचे असल्याचा साक्षात्कार प्रशासन व सत्ताधाऱ्यांना झाला. अखेर ऑगस्ट २०१२ मधील महासभेत हे रुग्णालय राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडे हस्तांतर करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. आणि १० जानेवारी २०१६ रोजी हे



“

२० फेब्रुवारीला भाईंदर येथील अप्पर तहसील कार्यालयावर इशारा मोर्चा काढण्यात येणार असून मोर्चादरम्यान हे रुग्णालय सुस्थितीत चालविण्यासाठी शासनाला आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीने संघटनेकडून भीक मांगो आंदोलनदेखील छेडण्यात येईल.

**- सुलतान पटेल,**
**कार्याध्यक्ष, श्रमजीवी संघटना**

रुग्णालय शासनाकडे हस्तांतर करण्यात आल्याचे तत्कालीन आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांनी पालिकेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात जाहीर केले.

शासनाकडे हस्तांतर झाल्यानंतरही या रुग्णालयात मोठ्या शस्त्रक्रियेसह आजारांवरील उपचार अद्यापही सुरु करण्यात आलेले नाहीत. तसेच पुरेशा मनुष्यबळाअभावी या रुग्णालयात रुग्णसेवा योग्य प्रकारे मिळत नसल्याने ते पीपीपी तत्वावर सुरु करण्यात यावे. त्यासाठी एका संस्थेला हे रुग्णालय चालविण्यासाठी देण्यात यावे.

तदनंतर रुग्णालयात लोकांना मोफत उपचार उपलब्ध होतील, असा दावा करीत आ. गीता जैन यांनी काही दिवसांपूर्वी राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांची भेट घेतली. त्यावेळी पार पडलेल्या बैठकीत जैन यांनी रुग्णालय पीपीपी तत्वावर सुरु करण्याची मागणी आरोग्यमंत्र्यांकडे केली. त्याला आरोग्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत त्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. मात्र हे रुग्णालय पीपीपी तत्वावर चालविण्याला श्रमजीवी संघटनेने तीव्र विरोध दर्शवून त्याविरोधात १ फेब्रुवारीपासून शहरभर आंदोलन छेडण्यास सुरुवात केली आहे. त्याचा प्रारंभ पश्चिम महामार्गावरील महाजनवाडी येथील आदिवासी लोकवस्तीतून करण्यात आला आहे.

पुढारी पा.नं.३.



# नालासोपाऱ्यात एकाची हत्या

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपाऱ्यात गुन्हेगारी कमी होण्याचे नाव घेत नाही. येथील बकाल वस्तीत गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक मोठ्या प्रमाणात राहत असून त्यांच्याकडून खून व हाणामारी हे प्रकार वाढत आहेत. दोन दिवसापूर्वी किरकोळ भांडणावरुन चौघांनी बांधकाम व्यावसायिकाची हत्या केली.



नालासोपारा पोलिसांनी गुन्ह्यातील चौघांना अटक केली आहे. मुसविर मोहम्मद अमीन असे हत्या झालेल्या बांधकाम व्यवसायिकाचे नाव आहे.

३० जानेवारीला टाकीपाडा येथील मशिदीजवळ संबंधितांची ट्रस्टच्या प्रकरणात मुसविर अमीन यांच्याशी हल्लेखोरांचा वाद झाला. झालेल्या मारहाणीत मुसविर यांच्यावर चाकू हल्ला झाला. त्यात ते जबर जखमी झाल्याने त्यांना मुंबईतील रुग्णालयात हलविले. तेथे त्यांचा उपचार सुरु असतानाच मृत्यू झाला.

पुढारी पा.नं.४

# बोलण्यात गुंतवून दागिने पळवले

**मिरारोड :** भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत एका महिलेला दोन अनोळखी इसमांनी खोटे बोलून अंगावरील दागिने काढून ठेवा पुढे चोरी होतील असे सांगितले व बोलण्यात गुंतवून रुमालात दगड बांधून दिले. व सोन्याचे दागिने घेऊन फरार झाल्याची घटना घडली आहे. त्याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत एक महिला रस्त्याने चालत जात असताना दोन अनोळखी इसम तिला रस्त्यात भेटले. त्यावेळी त्या महिलेला आम्ही गावावरून आलो आहोत आमच्याकडे स्टेशनला जाण्यासाठी पैसे नाहीत असे बोलण्यात गुंतवले. त्यावेळी तुमचे दागिने काढून ठेवा ते पुढे चोरी होतील असे सांगितले. तिने मंगळसूत्र व कानातील दागिने काढून रुमालात ठेवून त्यांना बोलण्यात गुंतवून दागिने पळवले.

पुढारी पा.नं.५.

# गुटखा विक्री करणाऱ्या पानटपरी चालकावर कारवाई

**मिरारोड :** काशिमिरा येथील गौरव एक्सलेन्सी रोडवरील घनश्याम पान शॉप या दुकानामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखु तसेच तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत हुक्का फ्लेवर विक्रीसाठी ठेवलेले असल्याचे आढळून आल्यामुळे त्याच्यावर अमली पदार्थ विरोधी कक्षाने कारवाई केली आहे. काशिमिरा येथील गौरव एक्सलेन्सी रोड लगत असलेल्या घनश्याम पान शॉप या दुकानाचा चालक अंकित रामसागर चौरसिया हा दुकानात गुटखा विक्री करत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी कक्षाला मिळाली. त्यानुसार त्या दुकानात छापा टाकला असता घनश्याम पान शॉप या दुकानामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखु व रॉयल स्मोकीन, अफजल, अलफकर, अल-अबरह, अल-आयान कंपनीचा तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत हुक्का बेकादेशीररित्या विक्रीकरीता साठवणुक केलेला मिळुन आला. हा मुद्देमाल दुकानातून ताब्यात घेउन जप्त करण्यात आला आहे. त्यामुळे त्याच्याविरुध्द भा.दं.वि.सं. कलम २७२, २७३ , ३२८ , ३४ सह सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने यांचा व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि त्यांचे उत्पादन, पुरवठा व वितरण यावर निर्बंध अधिनियम २००३ चे कलम ७ सह अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ मधील कलम २६ (२) (१) शिक्षा कलम ५९ तसेच अन्नसुरक्षा कलम २७ (३) (ड) (ई) काशीमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CS CamScanner

लोकमत पृ.५.३.

# 'लेडी डॉन'ची तडीपारी अटळ?

## आठ गंभीर गुन्हे : यापूर्वी नोटीस घेतली होती मागे

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : काशीमीरा परिसरातील कुख्यात पटेल टोळीतील लेडी डॉन गुलशन पटेल-तासे हिला दोन वर्षांकरिता ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, पालघर या जिल्ह्यातून हद्दपार करण्याबाबतची नोटीस पोलिसांनी बजावली आहे. तिच्यावर आठ गंभीर गुन्हे दाखल आहेत. .

काशीमीरा भागात कुख्यात असलेल्या पटेल कुटुंबातील तात्या उर्फ अश्रफ पटेल, बिलाल पटेल, अंजुम पटेल, गुलशन पटेल आदी अनेकांवर विविध प्रकारचे गुन्हे पोलिस दप्तरी दाखल आहेत. पटेल टोळीत आपसात वाद आहेत, पण प्रत्येकजण वेगवेगळ्या प्रकारे आपल्या गुन्हेगारी कारवाया करीत असतो . गुलशन पटेल-तासे ही लेडी डॉन म्हणून कुख्यात आहे. पोलीस उपायुक्त जयंत बजबळे यांनी जानेवारी महिन्यात तिच्यावर हद्दपारीचे आदेश जारी केले. काशीगाव येथील तिच्या बंगल्यावर पोलिस नोटीस घेऊन गेले असता गुलशन घरी नसल्याने घरावर हद्दपारीची नोटीस लावण्यात आली.

### महिन्यातून एकदा हजेरी

ठाणे जिल्ह्यासह मुंबई व मुंबई उपनगर, पालघर जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता तिला हद्दपारीचा आदेश जारी केला आहे. आदेश मिळताच दोन दिवसांत सदर जिल्ह्यांची हद्द सोडून जाण्यास तिला बजावले आहे. हद्दपारीदरम्यान ती ज्या भागात रहायला असेल तेथील स्थानिक पोलिस ठाण्यात महिन्यातून एकदा हजेरी लावायची आहे.



नोटिसीवर कोकण विभागीय आयुक्तांकडे अपील दाखल करण्यासाठी ३० दिवसांची मुदत गुलशनला पोलिसांनी दिली आहे.

पोलिसांच्या नोंदीनुसार २००१ ते २०२२ दरम्यान तिच्यावर काशीमीरा पोलिस ठाण्यात सात गुन्हे, तर मनोर पोलिस ठाण्यात एक गुन्हा दाखल आहे. तिच्या कारवायांमुळे याआधी २००९ , २०११ व २०१५ सालात पोलिसांनी तिच्यावर तडीपारीची कारवाई केली होती. २०१५ साली तडीपारीची कारवाई सुनावणीनंतर रद्द करण्यात आली. काशीमीरा पोलीस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ निरीक्षक संजय हजारे यांनी सप्टेंबर २०२२ मध्ये गुलशन हिला तडीपार करण्यासाठीचा प्रस्ताव सहायक आयुक्त विलास सानप यांच्याकडे सादर केला होता. सानप यांनी पडताळणी करून तो प्रस्ताव नोव्हेंबरमध्ये पोलीस उपायुक्तांकडे मंजुरीसाठी मांडला होता. उपायुक्तांनी गुलशन हिला नोटीस बजावल्यावर ती तिचे म्हणणे मांडण्यासाठी हजर झाली होती. २००१ सालच्या गुन्ह्यातून आपली निर्दोष सुटका झाल्याचे सांगतानाच २०२२ सालच्या गुन्ह्यात फिर्यादी हे नातेवाईक असून, रागाच्या भारत त्यांनी गुन्हा दाखल केल्याची बाजू मांडली. मात्र २००१ च्या गुन्ह्यातून निर्दोष सुटल्याची प्रत दिली नाही. २०२२ साली गुन्ह्यात अटक होऊन सुद्धा तिच्या वर्तनात सुधारणा झालेली नाही.

पुढारी पा.नं.८.

# पासपोर्टसाठी बनावट कागदपत्रे बनवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

पासपोर्टसाठी लागणारे बनावट दस्तावेज बनवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात तुळींज पोलीस ठाण्याच्या गोपनीय विभागाला यश आले आहे. याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात पासपोर्ट बनवण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर कारणारा, बनावट कागदपत्रे बनवून देणारा झेरॉक्स दुकानदार एजंट आणि एका शिक्षकावर गुन्हा दाखल करून अटक केली आहे

नालासोपारा पूर्वेकडील रेहमत नगर येथील असलम शर्फुद्दिन खान याने बनावट कागदपत्रांच्या आधारे पासपोर्टसाठी ऑनलाइन फॉर्म सादर केल्याची बाब गोपनीय विभागाचे विक्रम पन्हाळकर यांच्या निदर्शनास आली. त्यानंतर हे कागदपत्र पासपोर्ट विभागाकडून पडताळणीसाठी तुळींज पोलिस ठाण्यात पोहोचले. तेव्हा तुळींजच्या गोपनीय विभागाला त्या व्यक्तीच्या शाळेतील वास्तव्याचा दाखला संशयास्पद वाटल्यामुळे अधिक चौकशीसाठी शाळेच्या त्या प्रमाणपत्राची सत्यता पडताळणीसाठी गोपनीय विभागातील पोलिसांनी त्या शाळेशी संपर्क साधला असता, शाळा सोडल्याचा दाखला (लिव्हिंग सर्टिफिकेट) त्या शाळेचे नसल्याचे पोलीस तपासात उघड झाले.

त्यानंतर पोलीस हवालदार विक्रम पन्हाळकर यांनी कागदपत्रे देणाऱ्या असलम शर्फुद्दिन खान याला तुळींज पोलीस ठाण्यात बोलावून त्याची कसून चौकशी केली असता ही कागदपत्रे बनावट असल्याचे समोर आले. त्यांनी नालासोपारा रेल्वे स्थानकाजवळील एका झेरॉक्सच्या दुकानातून शादाब शेख या एजंटकडून ती २ हजार रुपयांना खरेदी केल्याची धक्कादायक माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून बनावट कागदपत्रे बनवणाऱ्या एजंटच्या दुकानावर छापा टाकला. तेथून पोलिसांना आणखी तीन बनावट शाळांचे प्रमाणपत्र मिळाले.

तसेच त्या दुकानातून प्रसिद्ध शाळांचे शिक्के, मुख्याध्यापकांच्या नावाचे शिक्के आणि इतर अनेक बनावट कागदपत्रेही जप्त केली आहेत. या प्रकरणी पोलिसांनी बनावट कागदपत्रे बनवणाऱ्या शादाब आणि बनावट कागदपत्रे सादर करणाऱ्या असलम शर्फुद्दिन खान, दुकानदार शादाब शेख, शिक्षक दशरथ केदार यांना अटक केली आहे. तर शाळेचे प्रमाणपत्र लिहून देणाऱ्या शिक्षक दशरथ केदारला रात्री उशिरा ताब्यात घेऊन अटक केली आहे.

लोकसत्ता पा.नं.५.

# मराठा आरक्षणाबाबत कृती गट

## एकजुटीने लढण्याचा मुख्यमंत्र्यांचा निर्धार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** मराठा समाजाचे आरक्षण मिळविण्यासाठी एकजुटीने लढा देऊ. समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे, ही सर्वांचीच प्रामाणिक इच्छा आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाची बाजू सर्वोच्च न्यायालयात आणखी प्रबळपणे मांडण्यासाठी, न्यायालयीन लढ्यासाठी विशेष कृती गट (टास्क फोर्स) स्थापन केला जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी येथे सांगितले.

मराठा समाजाचे आरक्षणाच्या अनुषंगाने सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत मराठा समाजाच्या विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा झाली. अनेक मुद्द्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आले.

बैठकीस मराठा समाज आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे आणि आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार भरत गोगावले यांच्यासह, राज्याचे मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव, महाधिवक्ता विरेंद्र सराफ, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव नितीन करिर, सामान्य प्रशासन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव नितीन गद्रे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भागे तसेच विविध विभागांचे सचिव, वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

न्यायालयीन लढा सुरूच राहील. या दरम्यान मराठा समाजाला ओबीसी प्रमाणेच सर्व सवलती व सुविधा देण्यात येतील. सारथी संस्थेच्या विस्तार आणि विविध योजना तसेच आणि आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकरिता निधीची कुठलीही कमतरता भासू दिली जाणार नाही, असेही शिंदे यांनी यावेळी जाहीर केले.

सारथी संस्थेकरिता निधीची तरतूद मोठ्या प्रमाणात करण्यात येईल. त्यासाठी कार्यक्रम आणि योजनांची व्याप्ती वाढवण्यात यावी. यासाठी मनुष्यबळ आणि आवश्यकर आर्थित तरतूद करण्यात येईल.

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृह व्हावे यासाठी या वसतिगृह योजनेचा आराखडा तयार करण्यात यावा. सारथीच्या योजना गावा-गावात पोहचविण्यासाठी दूत संकल्पना राबविण्यात यावी. याशिवाय आणखी अभिनव तसेच मराठा समाजातील तरुणांना शिक्षण, प्रशिक्षण यांच्यासह स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या योजनांवर आणखी भर देण्यात यावा असे आदेश त्यांनी दिले.


**RUNNING RESORT FOR SALE IN MATHERAN**

SPRING WOOD HERITAGE

* 23 Spacious & well appointed Rooms.
* Located in 2.5 Acres of Prime Land in Matheran.
* Large swimming pool
* Dining hall accommodated upto 50 guests & other leisure amenities.

Contact : 9594802955
https://spring-wood-heritage.business.site


पुण्यनगरी पृ.५१-४.

# भाईंदरमध्ये बांगलादेशी नागरिकाला अटक

**मीरा रोड :** नवघर पोलीस ठाणे हद्दीतील भाईंदर पूर्वच्या इंदिरानगर झोपडपट्टी, नवघर या भागात अनधिकृतपणे पासपोर्ट व व्हिसाशिवाय राहणाऱ्या एका बांगलादेशी नागरिकाला नवघर पोलीस ठाणे, दहशतवादी विरोधी पथकाने अटक केली.

भाईंदर पूर्वच्या नवघर पोलीस ठाणे, दहशतवादी विरोधी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक तुषार माळोदे यांना एक बांगलादेशी नागरिक इंदिरानगर झोपडपट्टी, नवघर येथे राहत असल्याची माहिती मिळाली. त्या माहितीनुसार, माळोदे यांनी पथकासह त्या ठिकाणी सापळा लावला असता, एक संशयित व्यक्ती तेथे आढळून आला. त्या वेळी त्याला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता, सोहेल नूरुल मिया हा बऱ्याच दिवसांपासून इंदिरानगर झोपडपट्टीत राहत असल्याचे त्याने सांगितले.

तो मूळचा बांगलादेशातील आहे. तो भारतात गेल्या १० वर्षांपासून राहत असल्याचे सांगितले. तो कामासाठी भाईंदर येथे आला आहे. त्याच्याकडे भारतीय नागरिकत्व असल्याचे कोणतेही कागदपत्र नसल्याचे आढळून आले. भारतात कोणत्या उद्देशाने, कोणत्या मार्गाने व कसा प्रवेश केला याबाबत विचारणा केली असता त्याने बांगलादेशमधील गरिबी, उपासमारी व बेरोजगारीला कंटाळून भारतात आल्याचे सांगितले. सोहेल नूरुल मिया हा गेल्या १० वर्षांपासून भाईंदर येथे राहत आहे. जेसीबी चालवण्याचे काम तो करत असल्याचे सांगितले. पोलिसांनी या बांगलादेशी नागरिकांवर गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत

# लाखोंचा ब्राऊन शुगर जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** बाजारवाई येथे २ फेब्रुवारीला रात्री नायगाव येथील आरोपी सरफराज अहमद (२४) या आरोपीच्या ताब्यातून विरार पोलिसांनी दोन लाख रुपये किमतीचा ६२ ग्रॅम वजनाचा ब्राऊन शुगर हा अमली पदार्थ जप्त केला आहे. ब्राऊन शुगर विक्री करता आणल्याचे तपासात निष्पन्न झाले असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. विरार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Feb 05, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner

लोकमत

# रस्त्यावर 'रिल्स'ची धडपड; थांबेल आयुष्याची धडधड !

## तरुणांना व्हिडीओला हवे जास्त लाइक : वाहतुकीचे नियम तुडवतात पायदळी


मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : सोशल मीडियावर प्रसिद्ध होण्याचे तरुण पिढीला व्यसनच लागले आहे. छोटे-छोटे रिल्स बनवून ते सोशल मीडियावर अपलोड केले जातात. आपल्या व्हिडीओला जास्तीत जास्त लाईक्स मिळावेत, यासाठी तरुणपिढी काहीतरी नवनवीन युक्त्या शोधून काढताना दिसते; पण या रिल्ससाठी केलेले धाडस कधी-कधी जीवावर बेतते. रस्त्यावर प्रवास करताना वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे आवश्यक असते. काही वाहनचालक या नियमांकडे दुर्लक्ष करताना दिसतात. तर या रिल्सच्या नादात तरुणाई नियम पायदळीच तुडवते.

अलीकडच्या काळात रस्त्यावर वाहन चालवताना स्टंट करणे, मद्यपान करून वाहन चालवणे, नियमांचे उल्लंघन करणे, सोशल मीडियावर व्हिडीओ रिल्स शेअर करण्यासाठी वेगात वाहने चालवणे, वाहन चालवतानाच रिल्स शूट करणे, यासारखे प्रकार घडताना दिसतात.

### १५० अपघात वर्षभरात

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर १२ जीवघेणी ठिकाणे असून, याठिकाणी मागील एका वर्षाच्या काळात झालेल्या १५० अपघातांत ५९ जणांनी आपला जीव गमावला आहे. तर ५४ जण गंभीर जखमी झाले आहेत.



### १८ पेक्षा कमी वय असूनही 'रिल्स' कशी बनवतो भावा

मिसरूड फुटण्याआधीच व कमी वय असलेल्या तरुणांना वाहन चालवायला देणे चुकीचे आहे. अल्पवयीन मुले विविध कंपन्यांच्या हायस्पीड बाईक 'धूम' स्टाईलने चालवतात.

तर काही ठिकाणी तर एका बाइकवर तिघे-चौघेजण बसून वेगाने फिरतात. १८ पेक्षा कमी वय असूनही वाहतुकीचे नियम मोडत 'रिल्स' कसे बनवतात ? असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे.

### मुलांकडे लक्ष द्या

सोशल मीडिया लाइफमध्ये मोबाइल प्रत्येकासाठी महत्त्वाचा झाला आहे. मुले सतत मोबाइल गेम खेळण्यात किंवा रिल्स बनवण्यात व्यस्त असतात. मुलांनी फोनचा अतिवापर करणे खूप धोकादायक ठरत आहे. त्यामुळे मोबाइल दिल्यानंतर आपला मुलगा काय बघतो, काय करतो, याकडेही पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

सध्या मुले पुन्हा स्क्रीन टाइमकडे वळू लागली आहेत. त्यामुळे आभासी जगासमोर म्हणजेच स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवला तर खेळ, व्यायाम, लोकांना भेटणे, बोलणे आणि जीवनात उपयुक्त असणारी कौशल्ये शिकणे याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. त्यामुळे मुले आजूबाजूच्या वातावरणापासून दूर जातात. याचा मुलांच्या विकासावर, मानसिकतेवर परिणाम होतो.

- डॉ. संदीप सरता

### रस्त्यावरील अपघातांना मोबाइल हे सर्वात मोठे कारण

वाहन चालविताना मोबाइलवर बोलताना अपघात होऊन चालकाचा मृत्यू झाल्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत.

जीवाची पर्वा न करता मोबाइलवर सतत बोलणे हे अनेकांच्या जीवावर बेतले आहे.

मोबाइलवर बोलत असताना वाहन चालवू नये किंवा वाहन चालविताना कुणाचा फोन आला तरीही फोन उचलू नये, असा वाहतूक नियम आहे.





CamScanner

# MBVV's crime detection rate up by 9% in 2022


SURESH GOLANI / MIRA-BHAYANDAR

The Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police have achieved an overall crime detection rate of 85% in 2022; which is a significant increase of 9% as compared to around 76% rate registered in 2021. From 67% in 2017 to 85% in 2022, the crime detection rate has gone up by 18% in the past six years.

The detection rate of murder cases had increased from 90% in 2021 to 100% in 2022. While 47 out of the 52 cases of murders reported in 2021 were solved from January 1 to December 31, 2021, all 38 cases were cracked during the corresponding period in 2022.

While the number of chain snatching cases have gone down from 113 in 2021 to 41 in 2022, the detection rate in this category has dipped to 56% from 66%. "The majority of first information reports (FIRs) registered are related to property and body offences. Apart from a well-oiled informer network and surveillance system, the thrust has been on immediate investigations. We will strive to further improve the detection as well as conviction rate," said Deputy Commissioner of Police (Crime) Avinash Ambure.

Notably, the total number of cyber-crime complaints received has leaped by more than three times from 794 in 2021 to 2,738 in 2022. From January 1 to December 31, 2022, cyber cops have recovered more than Rs 91.94 lakh which was siphoned off by fraudsters. In 2021, the figures stood at Rs 28.80 lakh.




The government had elevated the rural format of the Thane and Palghar police to a combined MBVV in October 2020. The MBVV commissionerate started off with limited manpower and resources, including 13 police stations and two traffic units. Gradually, the number of police stations have increased to 16.




CS CamScanner